संदर्भ :- १) श्री. सुभाष शंकर कश्यप. व इ. ३ रा. काश्यपे हॉस्पीटल, गंगापुररोड, नाशिक. ता.जि. नाशिक.यांचा दि.१८/१/२०१० चा अर्ज.
२) सहाय्यक संचालक,नगर रचना विभाग (मनपा)नाशिक यांचे पत्र क्र/एलएनडी/डब्लुएस/टेन्ट/पीएएनसीएच/सी-१/८२ दि. १/१/२०१०
३) विशेष भूसंपदन अधिकारी, क्र.२ नाशिक यांचे कडील पत्र क्र.क्र/नाहप्र/कावि/८०/२०१० दि. २/२/२०१०
४) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष/१५/गौखनि/१९४६/१० दि.९/९/२०१०
५) सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग (मनपा)नाशिक यांचे पत्र क्र/नामपा/न.र/झोन दाखला/पंच/११५० दि. २४/९/२००९
६) सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग (मनपा)नाशिक यांचे पत्र क्र/नामपा/न.र/झोन दाखला/पंच/११४९ दि. २४/९/२००९
७) सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग (मनपा)नाशिक यांचे पत्र क्र/नररवि/वशि/पंचवटी/१८६४/२०१० दि. २०/३/२०१०
८) आयुक्त, नाशिक महानगर पालिका, नाशिक यांचे पत्र क्र/नगररचना/वशि/पंचवटी/२३४/२०१० दि. १/११/२०१०
९) स्वीय सहाय्यक भूसंपादन नाशिक तथा उपजिल्हाधिकरी भूसंपादन वैतरणा नाशिक यांचे पत्र क्र/भूसंपादन कक्ष/१०/३/२२१/२०११ दि. ६/२/२०११

जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक
क्र.मह/कक्ष-३/४/बि.शे.प्र.क्र/३०/२०१०
नाशिक दिनांक ९८/७/२०११

आदेश

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६चे कलम ४४ प्रमाणे व त्याखालील नियमान्वये श्री. सुभाष शंकर कश्यपे. व इ. ३ रा. काश्यपे हॉस्पीटल, गंगापुररोड, नाशिक. ता.जि.नाशिक. यांनी मौजे.**नाशिक.**ता.जि.नाशिक येथील स.नं.२७८/२/१ पै. प्लॉट क्र. -- चे क्षेत्र १५९६१.०० चौ.मी. पैकी - ४०००.०० चौ.मी त्या पैकी ३९५०.०० **चौ.मी.** (अक्षरी क्षेत्र तिनहजार नऊशे पंन्नास चौ.मी.मात्र) या क्षेत्रात **निवासी** या कारणासाठी अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी मागणी केली आहे.मात्र सदर गट हा यापुर्वीच्या सिंहस्थ कुंभमेळया करीता तात्पुरत्या वाहनतळा करीता अधिग्रहीत झाला होता तरी आगामी सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ च्या नियोजनाच्या दृष्टीने मनपाने केलेल्या पर्यायी व्यवस्थे बाबत अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. २३/१२/२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार, म.न.पा चे उप अभियंता श्री. मोरे हे हजर होते. श्री. मोरे यांनी आगामी सिंहस्थ कुंभमेळयाचा नियोजीत आराखडा नकाशा सादर केला. श्री. मोरे यांचे म्हणनेनुसार प्रस्तावित जमीन ग.नं. २७८/२/१ आगामी सिंहस्थ कुंभमेळयासाठी आरक्षित नाही. तसेच त्यांचे भुसंपादनही करण्यांत आलेले नसुन भविष्यांतही प्रस्तावीत नाही. अर्जदार यांचा गट यापुर्वी सिंहस्थ कुंभमेळयासाठी तात्पुरता अधिग्रहीत करणेंत आलेली होती. आता सदर गटास बिनशेती देण्याबाबत सहाय्यक संचालक, मनपा नाशिक यांचे अभिप्राय मागणी केले असता त्यांनी त्यांचेकडील पत्र क्र/जा.क्र/एलएनडी/ डब्लुएस/ टेन्ट/ पीएएनसीएच/सी-१/८२ दि. १/१/२०१० च्या पत्रान्वये वरील प्रमाणे आयुक्त, नाशिक मनपा नाशिक व सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग नाशिक यांचेकडील वरील पत्रान्वये दिलेले अभिप्राय पाहता प्रस्तुत जमिन आगामी सिंहस्थ कुंभमेळयाकरीता नियोजीत आरक्षणाखाली नसल्याचे दिसुन येते त्यामुळे मौजे- नाशिक येथील स.नं. २७८/२/१ चे क्षेत्र ३९५०.०० चौ.मी यांस आयुक्त, मनपा नाशिक व सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्या वर नमुद केलेल्या पत्रांच्या व अभिप्रायाच्या आधारे रहीवासी कारणासाठी अकृषीक परवानगी खालील अटी व शर्तीवर देण्यांत येत आहे.

शर्ती :

१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियम व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियमास (सुधारीत १९७९ चे) अधिन राहून परवानगी देण्यांत येत आहे.
२) सदरहू परवानगी ही नागरी जमिन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ ला अधिन राहुन देण्यांत येत आहे.
२अ) परवानादार यांनी आदेशातील प्लॉटचे व सर्व प्लॉटचे विभाजन म.जिल्हाधिकारी यांचे पूर्व संमतीशिवाय करु नये.
३) परवानादार यांनी सदरहू जमिन व त्यावरील बिल्डिंग अथवा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे त्याच कारणासाठी करावा.तसेच सदरहू जमिनीचा किंवा सदरहू जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरील बिल्डिंगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुस-या कारणासाठी करावयाचा झाल्यांस यास म.जिल्हाधिकारी,नाशिक यांची लेखी पूर्व संमती घ्यावी. याच कारणासाठी बिल्डिंगचा उपयोग हा संपूर्ण जमिनीचा उपयोग म्हणून मानण्यांत येईल.
६) परवानादार यांनी हा आदेश दिलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत जमिनीची सुधारणा,मंजूर लेआऊट प्रमाणे म्हणजे रस्ते,ड्रेनेज इ. करावी की, ज्यामुळे जिल्हाधिकारी व संबंधित नगरपालिका यांची संमती राहील. त्याचप्रमाणे सदरहू लेआऊटमधील प्लॉटची मोजणी व रेखांकन सर्व्हे खात्याकडून करुन घ्यावी व जोपर्यंन्त जमिनीची सुधारणा होत नाही तोपर्यंन्त त्यामधील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावू नये.
५) परवानादार यांनी सदरहू जमिनीतील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावली तर परवानादार यांची जबाबदारी राहील की, सदरहू प्लॉटची विक्री किंवा विल्हेवाट ही आदेशातील शर्तीस अधीन राहून अथवा सनदेमधील शर्तीस अधीन राहून करावी.
६) सदरहू परवानगी ही देखाव्याच्या नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे ओटयावर बांधकामाप्रमाणे किंवा प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधावयाचे बिल्डिंगप्रमाणे करण्यांस देण्यांत येत आहे. प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा ठेवावी.
६अ) ही परवानगी बिल्डिंगचे बांधकामाबाबत मनपा कडील मंजुरीचे पत्रा मधील शर्तीस अधिन राहून देण्यांत येत आहे.
७) परवानगीदार यांनी संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/सहाय्यक संचालक/ ग्रामपंचायत/नगररचना यांचेकडून योग्य ती बांधकामाची परवानगी घेतल्यानंतरच बांधकामास सुरुवात करावी. सदरहू अट ही परवानगीदार यांचेवर बंधनकारक आहे.

८) परवानगीदार यांनी बिल्डिंग प्लॅन हे संबंधित सक्षम अधिका-यांकडून मंजूर करुन घ्यावेत. ज्या ठिकाणी सक्षम अधिकारी नाही, अशावेळी परवानगीदार यांनी महाराष्ट्र जमिन महसूल ( जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी ) नियम १९६९ अनुसूची-३ प्रमाणे प्लॅन तयार करुन तो म.जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर करुन त्याप्रमाणे बांधकाम करावे.

९) परवानादार यांनी राष्ट्रीय महामार्ग,जिल्हा मार्ग यामधील रस्त्याची सिमा व इमारतीची रांग यामधील व इमारतीची रांग या नियंत्रण रेषा या मधील रस्त्यापासूनचे अंतर महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी) नियम १९६९ अनुसूची - २ प्रमाणे ठेवावी.

१०) परवानादार यांनी हा आदेश दिल्याचे तारखेपासून एक वर्षाचे आंत मंजूरी दिलेल्या अकृषिक प्रयोजनासाठीच जमिनीचा वापर करावा, अन्यथा अकृषिक परवानगीची मुदत जिल्हाधिकारी यांचेकडून वेळोवेळी वाढवून घ्यावी. तसे न केल्यांस परवानगी रदद् समजण्यांत येईल.

११) परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा उपयोग सुरु केल्याबाबत अथवा उपयोगात बदल केल्याबाबत एक महिन्याचे आंत संबंधीत तलाठी/ तहसिलदार/ जिल्हाधिकारी नाशिक यांना कळवावे. अन्यथा, परवानादार यांचेविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी)नियम १९६६ (६) प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

१२) परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक सारा दर चौ.मि.ला रु.०.९६पै.निवासी या प्रमाणे ज्या अकृषिक कारणासाठी परवानगी दिली आहे, त्याच कारणासाठी आणल्यावे तारखेपासून भरावा दि.१/८/२०११ पासून सुधारीत अकृषिक दराने येणा-या फरकाची रक्कम भरण्याच्या अटीवर सदरची परवानगी देण्यांत येत आहे.

१३) सदरहू आदेशामधील नमूद केलेल्या अकृषिक सारा व सनदेमधील अकृषिक सारा ज्या ज्या वेळेस अकृषिक सारा बदलेल त्याप्रमाणे सारा बदलणेवर राहील.

१४) परवानादार यांनी मोजणी फि जमिनीचा उपयोग अकृषिक कारणासाठी अंमलात आणलेपासून एक महिन्याचे आंत भरावी.

१५) म. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी जमिनीची मोजणी केलेनंतर मोजणीप्रमाणे जमिनीचे क्षेत्रात व अकृषिक सा-यात बदल झाल्यांस त्याप्रमाणे क्षेत्र व सारा बदलता राहील.

१६) परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक कारणासाठी उपयोग सुरु केल्यापासून तीन वर्षाचे आंत बिल्डिंग व इतर बांधकाम पूर्ण करावे.सदरहू कालावधी म.जिल्हाधिकारी यांनी शासकीय आदेशाप्रमाणे परवानादार यांचेकडून दंड व नजराणा रक्कम भरुन घेऊन वाढवून देण्यांत येईल.

१७) परवानादार यांनी बिल्डिंग व इ. बांधकामे पूर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदलपूर्व परवानगी शिवाय व सदरहू बांधकामाचे प्लॅन जिल्हाधिकारी / सहाय्यक संचालक नगररचना / महानगर पालिका / नगर पालिका यांचेकडून मंजूर करुन घेतल्याशिवाय करु नये.

१८) परवानादार यांचेवर महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी ) नियम १९६९ चे अनुसूचि ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या शर्ती व नमुन्यामध्ये सनद बिनशेती उपयोग सुरु केल्यापासून एक महिन्याचे आंत करुन देण्यावे बंधनकारक राहील.

१९) परवानादार यांचेकडून या आदेशात नमूद केलेल्या शर्तीचा अथवा सनदेमध्ये नमूद केलेल्या शर्तीचा भंग केल्यांस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमान्वये म. जिल्हाधिकारी जो दंड व सारा फर्मावितील त्याप्रमाणे दंड व सारा भरुन घेऊन त्यांना जमिनीचा अकृषिक कारणासाठी उपयोग पुढे चालू ठेवता येईल.

१९अ)काहीही शर्ती नमूद केल्या असल्या तरीसुध्दा जिल्हाधिकारी यांना या परवानगीचे विरुध्द बिल्डिंग व इतर बांधकामे केली असल्यांस किंवा ते वाढवून किंवा त्यामध्ये बदल केला असल्यांस ते ठराविक मुदतीत काढून टाकण्यास फर्माविण्याचा कायदेशीर अधिकार राहील व सदरहू मुदतीत परवानादार यांनी तसे न केल्यांस म.जिल्हाधिकारी हे सदरहू बांधकाम काढून टाकतील व ते बांधकाम काढून टाकण्याचा खर्च परवानादार यांचेकडून जमिन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करतील.

२०)सदरहू परवानगी ही इतर कायद्यातील तरतूदीस अधिन राहून व सदरहू प्रकरणी त्या कायद्याच्या लागू असलेल्या तरतुदीस अधिन राहून म्हणजे मुंबई कुळ कायदा आणि शेत जमिन अधिनियम १९४९ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व नगरपालिका अधिनियम इ.चे तरतूदीस अधिन राहून देण्यांत येत आहे.

२१) बांधकामासाठी लागणा-या विटामध्ये फ्लायॲशव्दारे तयार करण्यात आलेल्या विटांचा वापर नियमितपणे करावा.

२२) सदरची परवानगी ही सहाय्यक संचालक, नगररचना मनपा नाशिक यांचे पत्र दि. १/१/२०१०, २४/९/२००९, २४/९/२००९, २०/३/२०१०, व आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे पत्र दि. ३/११/२०१० च्या आधारे देणेत येत आहे.

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी सो.
यांची स्वाक्षरी असे.

जिल्हाधिकारी नाशिक करिता

प्रति,

श्री. सुभाष शंकर कश्यपे. व इ. ३ रा. काश्यपे हॉस्पीटल, गंगापुररोड, नाशिक. ता.जि. नाशिक

प्रतिलिपीने:-मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिकरोड यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर,

प्रत:-मुळ कागदपत्र पान नं १ ते १४१ सह मा.तहसिलदार नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित

२/- त्यांना विनंती करण्यांत येते की,परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर केल्याबाबत लक्ष ठेवावे. परवानादार यांनी मौजे.नाशिक. स.न. २७८/२/१ प्लॉट क्र. -- चे क्षेत्र ३९५०.०० चौ.मी. क्षेत्राचा अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर तालुका फॉर्म नंबर ०२,गा.न.नं.०२ अकृषिक प्रयोजन नोंदवहीमध्ये बिनशेती सा-याबाबत योग्य ती नोंद घ्यावी.परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता वापरलेल्या तारखेपासून वसूल करण्याचे दृष्टिने काळजी घ्यावी व योग्य त्या नमुन्यामध्ये सनद करुन घ्यावी.

टीप:-परवानादार यांनी रुपांतरीत कराची रक्कम रुपये ९,४८०/- (रु- नऊहजार चारशे ऐंशी रु मात्र. ) सरकारी खजिन्यात दि. ८/४/२०११ रोजी भरली असून व मोजणी फि रुपये १५,०००/-(पंधराहजार रु मात्र.) दिनांक.८/४/२०११ रोजी चलनाने भरुन तशी चलने हजर केली आहेत.

प्रत:-१)मा.तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित .

२)मा.सहाय्यक संचालक,नगररचना महानगरपालिका, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित

३)मा.उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक.

४)कामगार तलाठी नाशिक.ता.जि.नाशिक

स्वाक्षरीत

जिल्हाधिकारी नाशिक करिता